वाचले :- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-२०१८/प्र.क्र.२/तां.क्र.३, दि. १३/१२/२०१८

क्र. ६४०/१९
जिल्हाधिकारी वाशिम यांचे कार्यालय,
वाशिम
दि. ०३/०८/२०१९

आदेश,

देशातील नद्यांच्या प्रदूषित पटटयांबाबत दि. १७/०१/२०१८ रोजी दैनिक "द हिंदू" मध्ये प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करून घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक २०/०९/२०१८ रोजी आदेश पारित करतांना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदुषित पटटे असून सदर प्रदुषित पटटयांचे वर्गीकरण प्राथम्य क्र. I ते IV प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकुण ५३ प्रदुषित पटटयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदुषित पटटयांमधील ९ प्रदुषित पटटे प्राथम्य क्र. I, ६ प्रदुषित पटटे प्राथम्य क्र. II, १४ प्रदुषित पटटे प्राथम्य क्रमांक III, १० प्रदुषित पटटे प्राथम्य क्र. IV व १४ प्रदुषित पटटे प्राथम्य क्र. V मध्ये समाविष्ट आहेत. वाशिम जिल्हयातील नद्यांचे प्रदुषित पटटे प्राथम्य क्रमांक III व IV मध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहे.

मा. हरीत लवाद. नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील ५२ प्रदुषित नद्यांच्या पटटयामधील प्रदूषण कमी करण्याकरीता कृति आराखडा तयार करणे. त्याची अंमलबजावणी करण्याकरीता नदी पुनरूत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याचे आदेश उपरोक्त शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदुषित नदीपटटयांमधील प्रदूषण रोखण्याकरीता वाशिम जिल्हयासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल (Special Environment Surveillance Task Force) ची स्थापना मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, वाशिम |
| २ | पोलिस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा, वाशिम |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अमरावती |
| ४ | सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, वाशिम |

उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वय साधणे, वेळ प्रसंगी क्षेत्र भेटीचे नियोजन करणे, बैठकांचे आयोजन करणे व निर्णयाची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अमरावती यांची राहील.

-सही-
जिल्हाधिकारी, वाशिम

प्रत,

१. वरिष्ठ भुवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, वाशिम
२. पोलिस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा, वाशिम
३. सचिव जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, वाशिम

जिल्हाधिकारी, वाशिम